# एक होता राजा

चांगली गोष्ट सांगणाऱ्या वडीलधाऱ्या मंडळींच्या भोवती छोट्या मंडळींचा घेराव पडलेला असतो. बालमनाच्या कल्पनाशक्तीची घडण या बालपणी ऐकलेल्या गोष्टींनीच सुरुवातीलाच होत असते. गोष्टीतले राजे, राण्या, राजपुत्र, राजकन्या या मनाला अशी मोहिनी घालतात की प्रत्येक बालक आपल्याला राजपुत्र समजतो; तर प्रत्येक छोटी मुलगी ही राजकन्याच असते ! राजपुत्र असणं चांगलंच, कारण पुढे चालून आपोआप राज्य मिळणार असतं. राजकन्येलासुद्धा नंतर राजपुत्राशी विवाह होऊन, राजवैभव भोगायला मिळणार असतं.

पण राक्षस लोक येऊन या साऱ्या आनंदाला विरजण लावून टाकतात. ते अतिशय दुष्ट असतात आणि खूपच शक्तीमानसुद्धा. ते सुंदर सुंदर राजकन्यांना कैदेतच टाकून देतात. आणि या सगळ्यांच्यावर जुलूम करत राहतात. मग राजपुत्राला खूप शूर बनावं लागतं. त्याच्यामागे दैवी शक्ती उभी असावी लागते. मग अनेक संकटांना तोंड देऊन तो दुष्ट राक्षसाला ठार करतो. राजकन्येला सोडवून आणून तिच्याशी विवाह करतो. असा सगळा आनंदीआनंद होतो.

हेच बालमनावरचे संस्कार पुढे कल्पित कथा-कादंबऱ्यांचं आकर्षण वाढवतात. सिनेमा म्हणजे पडद्यावर घडणारी कल्पित कादंबरीच असते. तुम्ही हिंदी सिनेमा पाहण्याचे शौकीन असाल तर वरच्या गोष्टीचा ढाचाच थोड्याफार फरकाने बहुतेक सगळ्या सिनेमात आढळेल. फक्त राजपुत्र, राजकन्या आणि

राक्षस यांच्या जागा नायक, नायिका आणि खलनायक यांनी घेतलेली असते. आजीबाईंच्या भोवती बसून उत्सुकतेने गोष्टी ऐकणारी बालकेच मोठी होऊन, सिनेमाचे चाहते बनलेले असतात. पण प्रत्यक्षात वास्तवाचे चटके चांगलेच बसायला लागलेले असतात. राजकन्येला सुंदर असून पुरेसं ठरत नाही. राजपुत्र राक्षसांशीच तडजोड करायला लागलेले दिसतात. राक्षसांचीच सत्ता जास्त प्रबळ होताना दिसते. तेच राज्य बळकावून टाकतात. राजपुत्राच्या पाठीशी उभी राहणारी दैवी शक्ती नाहीशीच झालेली असते.

प्रत्यक्ष राक्षसांशी सामना करायची धमक नसते. मग पडद्यावरचे नायक तसं करताना पाहून आनंद वाटायला लागतो. त्यांच्यामध्ये खरीच दैवी शक्ती आहे, असं समजून आपले प्रौढ आणि सुजाण मतदार नायक-नायिकांची कामं करणाऱ्या नट-नट्यांना निवडून देऊन गादीवर बसवतात. पण राज्य करण्याचा अभिनय, लोकांची स्वप्नं कशी पुरी करू शकेल ?

बालमनातल्या अद्भुताच्या प्रेमावरून कठोर वास्तवाकडे मुलांना समजू लागल्याबरोबर आणण्याचे प्रयत्न सुरू झाले पाहिजेत. कल्पनाशक्ती आणि स्वप्नरंजन यांना निश्चित स्थान आहे. पण त्यांच्याबरोबरच विचार आणि विवेक करण्याचं बाळकडू अत्यंत आवश्यक आहे. जिजामातेने शिवरायांवर असे संस्कार केले. त्या संस्कारांनी त्यांचे व्यक्तिमत्त्व उजळून उठले. त्यांच्या सान्निध्यात आलेले रांगडे मावळेसुद्धा भारले गेले आणि पारतंत्र्याचं जोखड झुगारून देणे शक्य झाले. बालकांना स्वप्नरंजनाचीच सवय पडू दिली, तर पुढच्या पिढीचं जीवन आपण भकास करून टाकणार आहोत. कठोर वास्तवाला सामोरं जाण्याचं धैर्य त्यांना देता आलं पाहिजे. नाहीतरी लोकशाहीत राजे आणि राजपुत्र हवे आहेत कशाला ?

---

**– भीष्मराज बाम**

**('मना सज्जना' या पुस्तकातून)**